CMYK

रिसोड तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या >>पान 2

मोफत व्यापक आरोग्य तपासणी मोहिमेचा ग्रामीण भागातील जनतेने लाभ घ्यावा - संजय रायमुलकर >>पान 3

मेहकर तालुक्यात ३१ हजार २०१ हेक्टर वरील पिकांना फटका >>पान 4

**सुविचार**
आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 298 ■ गुरूवार, दि. 10 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




तैमूर, जेहनंतर पुन्हा पटौदींच्या घरात पाळणा हलणार? करीनाच्या व्हेकेशन फोटोमुळे चर्चांना उधाण आतील पान

# गुजरातेत पूल कोसळला, वाहने नदीत पडली



वडोदरा: गुजरातमधील वडोदरा येथे महिसागर नदीवर बांधलेला पूल मंगळवारी सकाळी कोसळला. अपघाताच्या वेळी वाहने पुलावरून जात होती. पूल कोसळला तेव्हा एकूण पाच वाहने, दोन ट्रक, दोन कार आणि एक रिक्षा नदीत पडली. तुटलेल्या टोकावर एक टँकर अडकला. अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, तर ८ जणांना स्थानिक लोकांनी वाचवले. बचावकार्यासाठी अग्निशमन दलाच्या तीन पथके पाठवण्यात आली आहेत. ४५ वर्षे जुना हा पूल मध्य गुजरातला सौराष्ट्राशी जोडतो. पूल कोसळल्यामुळे दक्षिण गुजरातमधील भरूच, सुरत, नवसारी, तापी आणि वलसाड यासारख्या शहरांमधून सौराष्ट्रला पोहोचण्यासाठी अधिक वेळ लागेल. आता यासाठी अहमदाबादमार्गे लांब मार्गाने जावे लागेल.

## ९ जणांचा अंत, ८ जणांना वाचवलं



अपघातानंतर लगेचच स्थानिक लोक घटनास्थळी पोहोचले आणि लोकांना वाचवले. एका स्थानिक तरुणाने सांगितले की, ''आम्ही सकाळपासून बचावकार्य सुरू केले आहे. आतापर्यंत ९ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, त्यापैकी एक मूल आहे आणि एक मूल बेपत्ता आहे. या काळात आम्हाला प्रशासन आणि अधिकाऱ्यांकडून कोणतीही मदत मिळालेली नाही.'' स्थानिकांनी सांगितले की, पुलाची दुरुस्ती न झाल्यामुळे हा अपघात झाला. या अपघातात ८ जण जखमी झाले आहेत. ६ जणांना वडोदरा येथील पद्रा रुग्णालयात आणि २ जणांना सयाजी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच लोकांची गर्दी जमली. त्यांनी प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला.

लोकांनी सांगितले की, ४५ वर्षे जुन्या या पुलाची दुरुस्ती करण्यासाठी प्रशासनाला अनेकवेळा कळिवण्यात आले आहे. प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्यामुळे आज ही दुर्घटना घडली. मुख्यमंत्र्यांनी तज्ज्ञांच्या पथकाला चौकशीचे आदेश दिले आहेत. घटनेचे गांभीर्य पाहून मुख्यमंत्र्यांनी तांत्रिक तज्ज्ञांचे पथक घटनास्थळी पाठवून चौकशीचे आदेश दिले आहेत. या घटनेमुळे पुन्हा एकदा जुन्या आणि कमकुवत पायाभूत सुविधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. जर वेळेत वाहनांची वाहतूक थांबवली असती आणि नवीन पुलाचे बांधकाम सुरू झाले असते, तर कदाचित ही दुर्घटना टाळता आली असती. आता तपास अहवालात काय बाहेर येते आणि दोषींवर काय कारवाई होते हे पाहावे लागेल.

# मेहकर तालुक्यातील २३ एन ए लेआउट रद्द

## अनेकांचे झाले आहेत खीसे गरम, मात्र प्लॉट खरेदी करण्याचे प्लॉटचे काय?

## अनेक लेआऊटधारक प्लॉट विकून मोकळे : प्लॉट विक्रीत सावळागोंधळ

**मेहकर/प्रतिनिधी :** उपविभागमध्ये येणाऱ्या लोणार व मेहकर तालुक्यातील ले-आऊट प्रकरण मागील काही वर्षापासून चांगलचे गाजत आहे. या प्रकरणात आता उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांनी सरळ कार्यवाही करत मेहकर तालुक्यातील २३ ले-आऊटची खरेदी-विक्री पुढील आदेशापर्यंत रद्द केली आहे. त्यामुळे मेहकर येथील खरेदी-विक्रीचे व्यवहार ठप्प झाले असून अनेकांचे आर्थिक व्यवहारही रडखडले आहे.परिणामी प्लॉटखरेदी व विक्रीधारकांमध्ये कमालीचे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मेहकर उपविभागात येणाऱ्या लोणार व मेहकर तालुक्यातील काही ले-आऊटसाठी अकृषिक जमिनीच्या मंजुरी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले आहे. नगररचना कार्यालयाची कुठलीही परवानगी नसताना किंवा पळवाट काढून आवश्यक अहवाल प्राप्त नसताना देखील अनेक ले आउट मंजूर करण्यात आले.यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला आहे. त्यावर एसडीओ रवींद्र जोगी यांनी नोटीस बजावल्या होत्या. दरम्यान, उपरोक्त नियमबाह्य पद्धतीने आठ अ मंजुरी घेणाऱ्या सध्या मेहकर तालुक्यातील २३ ले-आऊट धारकांच्या ले-आऊटमधील खरेदी-विक्री बंद करण्याचे आदेश उपविभाग महसूल अधिकारी रवींद्र जोगी यांनी दिले असून ४ जुलैपासून पुढील आदेशापर्यंत सर्व व्यवहार बंद राहणार आहेत.

सद्या २३ ले-आऊटमधील खरेदी-विक्री बंद करण्याचे आदेश दुय्यम निबंधक यांना मिळालेले असून तशा आशयची नोटीस दुय्यम निबंधक मेहकर यांनी त्यांच्या कार्यालयात लावलेली आहे. काही दिवसांत ऐकून ५५ ते ६० ले-आऊटच्या खरेदी-विक्री बंद करण्याचे आदेश झळकणार असल्याचे बोलल्या जात आहे.मेहकर तालुक्यातील २३ ले-आऊटमधील खरेदी-विक्री बंद करण्याचे आदेश आल्यापासून मेहकर येथील प्लॉट खरेदी-विक्रीवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. दिवसाला ३० ते ३५ व्यवहार होत असे. आता सदर आकडा २० ते २५ वर आला आहे. अजून किती ले-आऊटचे प्रकरण समोर येणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.



### मेहकर उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाचे आदेशान्वये रद्द करण्यात आलेले ले-आऊट

पक्षकारांमध्ये रऊफशहा अब्दुलशहा व तस्लीमशहा व अब्दुल शहा छोटा, रमेश गिनाजी धोंडगे, रा. भालेगांव, रामभाऊ विठोबा जाधव, गजानन विनकर, विक्की नायर मेहकर. अशोक रामभाऊ रायते रा. मेहकर.विलास सुदाम दुद्धाट, जामगांव, सुनिता विलास काळे रा.शहापुर, मयुरा अंकुश आलेगांवकर रा डोणगांव, गोपाल प्रल्हाद ठाकरे, महमंद हित्तु गवळी मेहकर, रुपाली विकी नाईक व इतर,आकांक्षा निखील महादत मेहकर, दिपक नेमाडे व इतर. वैभव रविंद्र इंगळे व इतर, शेख चांद शे.मेहबूब व इतर.शे. बशीर शे करीम व इतर, रुपाली मनोज जाबाब व इतर, गजानन इनकर व इतर, दिपक अग्रवाल व इतर, भास्कर सुखदेव दुधाट,सुरेश अर्जुन चोपडे व इतर, विकी नारायण नायर व इतर, राम गणेशराव गिते, विकी शिवराम नायर व इतर.डॉ. सोनल आशिष लोहीया व इतर यांच्या नावाचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

# तुकडेबंदी कायदा शिथिल; ५० लाख शेतकऱ्यांना दिलासा

### महसूल मंत्री बावनकुळेंची मोठी घोषणा, महाविकास आघाडीकडून स्वागत



**मुंबई/प्रतिनिधी :** तुकडेबंदी कायदा रद्द करण्याची मोठी घोषणा महसूल चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. या निर्णयाने राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. बावनकुळेंच्या घोषणेचं महाविकास आघाडीकडून स्वागत केलं आहे. या संदर्भात १५ दिवसात एसओपी केली जाणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार १ जानेवारी २०२५ पर्यंत जे तुकडे झाले, तुकडी बंद कायदा असल्याने व्यवहार करता येत नाही. तुकडे बंदी कायदा रद्द केला जाईल. एक एसओपी केली जाईल. महसूल, नगरविकास, जमाबंदी आयुक्त या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठित केली जाईल. ही समिती एसओपी करेल. सुमारे ५० लाख लोकांना फायदा होईल. या संदर्भातील १५ दिवसात सूचना असतील, तर कराव्यात असेही बावनकुळे यांनी आवाहन केलं आहे.

विजय वडेट्टीवार स्वागत करताना म्हणाले की, हा अतिशय मोठा निर्णय असून दलालांनी मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे. यामध्ये काही लोकांनी आत्महत्याही केल्या आहेत. मात्र हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी महसूल मंत्र्यांनी केलेली घोषणा चांगली असल्याचे सांगितले. मी या निर्णयाचे स्वागत करत असून अनेक महसूलमंत्री झाले. मात्र त्यातील हा चांगला निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्रात तुकडेबंदी लागू आहे. म्हणजे काय तर तुकडेबंदी कायद्यात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. महाराष्ट्र सरकारच्या १२ जुलै २०२१ च्या परिपत्रकानुसार, १,२,३ अशी गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्याला निर्बंध आले होते. या परिपत्रकाला विरोधही झाला होता. हे प्रकरण न्यायालयतही गेलं होतं. त्यानंतर ५ मे २०२२ राज्य सरकारनं प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार, राज्यातल्या सगळ्या जिल्ह्यांमध्ये जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, तर बागायत जमिनीसाठी १० गुंठे एवढं तुकड्याचं प्रमाणभूत क्षेत्र नमूद करण्यात आलं. बऱ्याचशा शेतकऱ्यांना विहिरीसाठी किंवा शेतरस्त्यासाठी किंवा इतर काही कारणास्तव १, २, ३ गुंठ्यांमध्ये जमिनी खरेदी किंवा विक्री करावी लागते. त्यामुळे या शेतकऱ्यांसमोर अडचण निर्माण झाली होती. आता याच शेतकऱ्यांसाठी दिलासादायक गोष्ट आहे.

### भरदुपारी रस्त्यात कारमध्ये युनिट मॅनेजर तरुणीवर अत्याचाराचा प्रयत्न; तिने आरोपीच्या गुप्तांगावर केला वार अनब...अकोला हादरलं

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला शहरात भरदिवसा, गजबजलेल्या रस्त्यावर एका तरुणीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आदित्य बिर्ला हेल्थ इन्शुरन्स कंपनीत कार्यरत असलेल्या २२ वर्षीय युनिट मॅनेजर तरुणीवर, कंपनीच्याच एजंटने कारमध्ये ही जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रसंगावधान राखत तरुणीने थेट आरोपीच्या गुप्तांगावर लाथ मारत स्वत:ची सुटका करून घेतली. अकोला शहरातील जठारपेठ चौकात भरदुपारी ही घडली घटना घडली आहे.

१६ जून रोजी पीडित तरुणी रोजच्या प्रमाणे ड्युटीवर होती. एजंट गणेश ठाकूर याने ''कस्टमर कॉल'' असल्याचं सांगून तिला सोबत बाहेर नेलं. दोघंही कारने शहरात फिरत होते. सायंकाळी ६ च्या सुमारास जठारपेठ चौकात, एका दूध डेअरीसमोर कार थांबवण्यात आली. अचानक आरोपी कारच्या मागच्या सीटवर आला आणि तरुणीचा हात पकडून तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न केला. तरुणीने आरडाओरड केली असता त्याने तिचं तोंड दाबलं, मारहाण केली आणि शरीरसुखाची मागणी करत दबाव टाकला. मात्र पीडितेने आत्मविश्वासाने लढा दिला. तिने त्याच्या गुप्तांगावर जोरदार लाथ मारली आणि कारमधून बाहेर पडत घटनास्थळावरून सुटका केली.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी सांधला आंदोलकांशी संवाद

## मागणी पदरात पाडून देण्याची आंदोलकांना ग्वाही

दैनिक आपला विदर्भ






**मुंबई/प्रतिनिधी :** ' विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना अनुदानाची वाढीव रक्कम मिळावी, या मागणीसाठी आझाद मैदानावर शिक्षक समन्वयक संघाने पुकारलेल्या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी सहभागी होत आंदोलकांशी संवाद साधला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून न्याय्य मागणीसाठी दुर्दैवाने तुम्हाला संघर्ष करण्याची आज वेळ आलेली आहे. शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी हे महाराष्ट्राच्या प्रशासनाचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. त्यांना सन्मानाने जगण्याची भूमिका ही राज्यकर्त्यांनी घेतली पाहिजे, आणि ती घेतल्यानंतर समाजाच्या सेवेची जबाबदारी आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानदानाची असेल, शासकीय ऑफिसमध्ये काम करणारा चतुर्थ श्रेणीचा कर्मचारी असेल त्याच्या मार्फत प्रशासकीय सेवेचं काम असेल. जे जे काम त्यांच्याकडे येतं त्या कामातून जनतेला, विद्यार्थ्यांना- विद्यार्थिनींना सन्मानजनक वागणूक आणि आधार ही देण्याची जबाबदारी तुम्हा घटकांची आहे,आणि ज्या वेळेस तुमच्यावर जबाबदारी आहे. त्यावेळी राज्यकर्त्यांचीही जबाबदारी आहे की, राज्याच्या प्रशासनामध्ये मग ते शैक्षणिक क्षेत्र असो, प्रशासकीय क्षेत्र असो, तिथं जो राबतो त्याला सन्मानानं जगण्याची संधी ही त्यांनी द्यायलाच पाहिजे आणि हा दृष्टिकोन आम्ही लोकांनी नेहमीच स्वीकारला. मला रोहित पवारांकडून समजलं की इथं एक राज्याचे मंत्री येतायत. मला असं वाटतं मंत्री येतायत ठीक आहे. चर्चा करतील, प्रश्न सोडवतील पण प्रश्न अद्याप सुटलेला नाही. याचा अर्थ हा आहे की, आता राज्य सरकारला स्पष्ट सांगावं लागेल की बाकी कुणाचाही बाबतीत कुणाची काही तक्रार असेल तर, त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही पण ज्ञानदानाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे आणि उद्याची महाराष्ट्राची पिढी ही तयार करायची नैतिक जबाबदारी ज्यांनी अंत:करणापासून स्वीकारलेली आहे.त्यांना संघर्ष करण्याची वेळ येऊन देऊ नका. लवकरात लवकर जी २४ ऑक्टोबरची जी काही तुम्ही ऑर्डर काढली ती पोकळ ऑर्डर ठेवू नका त्यासाठी काही हजार बाराशे कोटी लागतील. मला आकडा नक्की माहिती नाही. त्याची तरतूद करा आणि पैसे द्यायला सुरुवात करा आणि या राज्यामध्ये शिक्षकांचा सन्मानच होतो या प्रकारचा इतिहास घडवा. हा आग्रह आम्ही लोक राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सांगू. मला असं वाटतं की, हा तुम्हा सगळ्यांचा आग्रह योग्य आग्रह असल्यामुळे त्यांना याबद्दलचा निर्णय घ्यावा लागेल आणि त्यासंबंधीची आग्रही भूमिका मी आणि आमच्या सगळ्या सहकाऱ्यांकडून घेतली जाईल. महाराष्ट्राची विधानसभा, महाराष्ट्राची विधान परिषद, देशाची लोकसभा आणि देशाची राज्यसभा यासगळ्या संस्थेमध्ये गेली ५६ वर्ष मी सतत कार्यरत आहे आणि त्यामुळे या प्रशासनाच्या संबंधी तुम्ही काही चिंता करू नका. कसा निर्णय घ्यायचा असतो, कशी तरतूद आणायची असते आणि तुम्हाला ती कशी द्यायची असते हे मला कुणी शिकवायची गरज नाही. ती मागणी पदरात पडेल. अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवारयांनी आंदोलकांना दिली.

CMYK

## गुरु पौर्णिमा

आज गुरुपौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंच्याप्रति लिन होण्याचा आणि गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. आषाढ महिन्यांत गुरु पौर्णिमा साजरी केली जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतो. या दिवशी गुरुतत्व एक हजार एक हजार पटीने कार्यरत असते त्यासाठी शिष्य यादिवशी अखंड आपल्या गुरुसेवेत मग्न असतो. गुरू शिष्य नाते हे असे एक नाते आहे की ज्याला मर्यादा नाही. अखंड साधनेत कार्यमग्न असणे, गुरूंनी दिलेले नाम घेणे, गुरूंचा महिमा गाणे, प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता गुरू कार्य करणे, असं अतूट नातं म्हणजे गुरू शिष्याचं नातं. गुरू शिष्य परंपरा हे आपल्या भारत देशाचं एक वैशिष्ठ्य म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. आपल्या देशात तर गुरुचे महत्व खुप आहे. गुरूला साक्षात देव मानणारी आपली संस्कृती आहे. म्हणूनच गुरुर ब्रह्मा। गुरुर विष्णू। गुरुर देवो माहेश्वरा। गुरू साक्षात परब्रह्म। तस्मई श्री गुरू देव नमः अशी आपण गुरूंची ओळख करून देतो. गुरू म्हणजे काय ? गुरूंचे महत्व काय? आपल्या जीवनात गुरूंचे असणे म्हणजे काय? या सगळ्या गोष्टींची उत्तरे एका लेखात मिळणे अशक्य आहे यास्तव थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला देव दाखवता येत नाही, पण गुरूंच्या माध्यमातून आपण देवालाच अनुभवत असतो. देवाने गुरूंच्या माध्यमातून केलेली कृपा अनुभवत असतो. गुरूंची लीला शब्दात मांडणे अशक्य आहे. म्हणून तर आपण दरवर्षी गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरा करतो. गुरू हा संतकुळीचा राजा। गुरू हा प्राण विसावा माझा। गुरुविण देवपूजा पाहत नाही त्रैलोकी। वरील काव्य पंक्तीतून गुरू शब्दाची महती येते. कारण गुरूला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुच आपल्याला अज्ञानातून बाहेर काढतात. प्रथम आपण गुरु या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे नाहीसे करणारा. गुरू आपल्याला जीवनातील विकारांचे अज्ञान दूर करून आनंदी जीवन कसे जगावे हे शिकवतात आणि प्रकाशाच्या म्हणजेच ज्ञानरुपी योग्य वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा आहे. अंधकाराचा नाश करून प्रकाशाचा किरण देणारा गुरू असतो. एकदा का गुरू आपल्या आयुष्यात आले की त्यांची कृपा सतत आपल्यावर होत राहते. गुरूंनी सांगितलेली साधना सतत करणे हीच गुरूंविषयी खरी कृतज्ञता होय. गुरू आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतात. त्यांना आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा झालेला पाहणे एव्हढेच अपेक्षित आहे. त्यासाठी ते आपल्या आपल्या शिष्यांना उत्तम असे ज्ञान देत असतात. जर उत्तम ज्ञान मिळवून उत्तम व्यक्ती म्हणून समाजात ज्ञान कमवायचे असेल तर जीवनात गुरुंना पर्याय नाही. माणसाच्या जीवनातील पहिले गुरू म्हणजे त्याचे आईवडील.आई ही तर आपल्या जीवनातील प्रथम आद्य गुरू. आई इतकं श्रेष्ठ दैवत या जगात नाही असं समर्थांनी लिहिले आहे. मूल जेंव्हा लहान असते तेंव्हा आईवडीलच त्याच्यावर संस्कार करीत असतात.त्याला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनात कसे वागायचे ते शिकवत असतात.आईवडील हेच तर आपले प्रथम गुरू असतात. म्हणून त्यांचा आदर करायला हवा. आईवडीलानंतर नंबर लागतो तो शिक्षकांचा त्यांचीही आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका असते. मुलांवर योग्य आणि चांगले संस्कार करण्याचे, बाल मनाला पैलू पाडण्याचे काम शिक्षक करीत असतात. मुलांच्या जीवनाला खरा आकार शिक्षकच देत असतात. आईवडील आणि शिक्षकांनी कोऱ्या पाटीवर केलेले संस्कार कायमस्वरूपी टिकून राहतात मग ते चांगले असोत की वाईट. त्याचाच प्रभाव त्या मुलांच्या पुढील आयुष्यात कायम राहतात. आईवडील आणि शिक्षकच नव्हे तर जन्मापासून आपण आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींपासून, व्यक्तींपासून काही ना काही तरी शिकतच असतो. प्रत्येक गोष्ट जी आपल्याला शिकवण देते ती गुरुच असते. उदाहरणार्थ- सूर्य, पृथ्वी, नदी, जल, वारा, अग्नी, झाडे, पाने, फुले, ढग,डोंगर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवत असते. या सर्वांना आपण गुरुस्थानी मानून त्या प्रत्येक पदार्थांविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांची देण्याची, त्यागाची, परोपकाराची वृत्ती आपण जोपासली पाहिजे. या सर्व गोष्टी जोपासण्यासाठी आपल्याला गुरूंची आवश्यकता असते.

# रिसोड तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या

## शरदचंद्र पवार राष्ट्रवादी युवक काँग्रेस रिसोड तालुकाध्यक्ष माधवराव वामनराव शेवाळे यांची मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यात २५ व २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीने जनता हतबल झाली असून तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यां समोर जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नैसर्गिक आपत्तीने हतबल झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांना व नागरिकांना मायबाप शासनाने तात्काळ आर्थिक मदत दे मदत देऊन शेतकऱ्यांना धीर द्यावा. अशी मागणी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी युवक काँग्रेस रिसोड तालुकाध्यक्ष माधवराव वामनराव शेवाळे यांनी ९ जुलै रोजी मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे.

मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की,रिसोड तालुक्यात तब्बल ५ हजार ३१३ हेक्टर वरील पिकांना फटका बसला असून ४ हजार ७१८ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.तर, अतिवृष्टीने ९७८ हेक्टर क्षेत्रावरील जमिनी खरडून गेल्या आहेत. याचा ८५० शेकऱ्यांना फटका बसला आहे. तर,केनवड परिसरात ११० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. याचा ५० शेतकऱ्यांना फटका बसला आहे. तर, ८ हेक्टर जमिन खरडून गेली असून याचा ५ शतकऱ्यांना फटका बसला आहे. पिंपरी सरहद्द परिसरात ४०० हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले असून २९० श्येतकऱ्यांचे आथ्यिक नुकसान झाले.परिसरातील २६५ हेक्टर जमिन खरडून गेल्याने २४० शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. कुकसा परिसरात २७५ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नष्ट होऊन २४० शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे.कुकसा परिसरात २७५ हेक्टर जमिनीवरील पिके नष्ट होऊन २६० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तर १०० हेक्टर जमिन खरडून जवळपास १०० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अंचळ परिसरात ४४३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून ३४० शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. तर, १०० हेक्टर जमीन खरडून ७० शेतकऱ्यो नुकसान झाले आहे. नेतंसा परिसरात ६०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून ४०० शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. तर २०० हेक्टर जमिनी खरडून १५० शेतकऱ्यांचे नुकसानर झाले आहे. जामखेड



पिरसरात १६० हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान होऊन १८० शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. तर, ४० हेक्टर जमिन खरडून ३० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तपोवन परिसरातील ६० हेक्टर जमिनीचे तर, १५० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.त्याचबरोबर २० हेक्टर जमिन खरडून १५ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.कोयाळी बु., परिसरात ४५० हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान होऊन ३०० तर,९० हेक्टर क्षेत्रावरील जमिन खरडून गेल्याने ८० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. गणेशपूर पिरसरातत ३०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून याचा ६० शेतकऱ्यांना फटका बसला आहे.जोगेश्वरी परिसरात ८० हेक्टर जमिनीवरील पिकांचे अतिव्रष्टीने तर, ३५ हेक्टरवरील जमिनी खरडून गेल्याने १९० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कळमगव्हाण परिसरात ४३३ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान होऊन २११ शेतकऱ्यांची हानी झाली आहे. नंधाना परिसरात ५२९ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान होऊन ६०३ शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे.जांब अढाव परिसरातील ४२८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान होऊन ५५२ शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. नावली परिसरात ८०५ हेक्टरवरील पिकांचे व ५६८ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. व कोयाळी खु. परिसरातील ५१० हेक्टरवरील पिकांचे नुकसान होऊन याचा ३०४ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. तर२० हेक्टरवरील जमिनी खरडून गेल्याने १० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. असे रिसोड तालुक्यातील १५ गावांमध्ये ५ हजार ३१३ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले असून याचा ४ हजार ७१८ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. तर ९७८ हेक्टर क्षेत्रावरील जमिनी खरडून गेल्याने ८५० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.सदर अहवाल मंडळ अधिकारी यांनी वरिष्ठांकडे सादर केला आहे. नैसर्गिक आपत्तीने तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिक हतबल झाला असून या नुकसानीचा मायबाप शासनाने तात्काळ मोबदला म्हणून आर्थिक मदत द्यावी.अशी मागणी ९ जुलै रोजी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी युवक काँग्रेस रिसोड तालुकाध्यक्ष माधवराव वामनराव शेवाळे यांनी शरदचंद्रजी पवार यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी उपस्थित राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सचिव पंकज पळसकर. राष्ट्रवादी युवक काँग्रेस बुलडाणा जिल्हाध्यक्ष गोपाल सुभाषराव आखाडे सह उपस्थित होते

# शाळा बंद आंदोलनास रिसोड तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद





**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** गेल्या वीस वर्षापासून विनाअनुदानित तसेच अंशतः अनुदानित शाळेवर काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मुंबई येथील आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरू आहे. त्याला पाठिंबा म्हणून शिक्षकांशी संबंधित विविध संघटनांनी तसेच शिक्षक आमदार किरणराव सरनाईक पुरस्कृत अमरावती विभागीय शिक्षक संघाने या आंदोलनास जाहीर पाठिंबा देत वाशिम जिल्ह्यातील सर्वच शाळांनी काम बंद आंदोलनामध्ये सहभाग नोंदविला आहे.

रिसोड तालुक्यातील शाळांनी या कामबंद आंदोलनामध्ये सहभाग नोंदवत शासनाचा निषेध करीत दिनांक ८ जुलै व ९ जुलै असे दोन दिवस कडकडीत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असून, आजच्या या पहिल्या दिवशी तालुक्यातील सर्व शाळा कडकडीत बंद होत्या. यामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनींनी आपल्या प्राचार्या मार्फत शासनाकडे निवेदन सादर केले असून या निवेदनात म्हटले आहे की आमचे बंधू-भगिनी जे आझाद मैदान मुंबई येथे शासनाच्या आडमुठ्या धोरणा विरोधात आंदोलन करीत आहेत त्यांच्या आंदोलनास आमचा संपूर्ण पाठिंबा आहे. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासनाने पुढील टप्पा अनुदानाचा शासन निर्णय जाहीर करूनही अद्यापही त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे सर्व शिक्षक संघटना नाराज आहेत. पावसाळी अधिवेशनात तरी अनुदानाचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी विधान परिषदेमध्ये हा प्रश्न लावून धरला असून आंदोलनाला बळ मिळावे यासाठी तालुक्यातील सर्व शिक्षक बंधूंनी आज काम बंध आंदोलन करून कडकडीत बंद पाळला. शासनाजवळ सर्व बाबींसाठी पैसा असून शिक्षकांना अनुदान देण्याचा प्रश्न आला की शासन तिजोरी खाली असल्याचे कारण पुढे करून अनुदानाचा प्रश्न पुढे ढकलला जातआहे, त्यामुळे आता आंदोलनाशिवाय पर्याय उरला नसल्याकारणाने सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर संघटना अनुदानासाठी एकवटले असून अनुदान मिळेपर्यंत हे आंदोलन चालू ठेवण्याचा निर्धार संघटनांनी व्यक्त केला आहे.

### लग्नाच्या ३ वर्षांतच स्टार कपलचा घटस्फोट? प्रसिद्ध अभिनेत्रीच्या व्हायरल पोस्टनंतर चर्चांना उधाण

**मुंबई/प्रतिनिधी :** टेलिव्हिजन अभिनेत्री पायल रोहतगीनं तीन वर्षांपूर्वी पहलवान संग्राम सिंहशी आपली लग्नगाठ बांधलेली. पण, आता मात्र तीन वर्षांच्या सुखी संसारानंतर दोघेही काडीमोड घेणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. पायल रोहतगीनं सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. ही पोस्टच पायल आणि संग्रामच्या घटस्फोटाच्या अफवांना कारणीभूत ठरली आहे. तसेच, पायल रोहतगीनं संग्रामच्या कंपनीतून राजीनामाही दिला आहे.

पायल रोहतगीनं राजीनामा पत्राचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये तिनं लिहिलेलं की, ''वैयक्तिक कारणांमुळे मी संग्राम सिंह चॅरिटेबल फाउंडेशनच्या संचालक पदावरून तात्काळ राजीनामा देत आहे. मी बोर्डाला विनंती करते की, कृपया माझा राजीनामा स्वीकारावा आणि कंपनी रजिस्ट्रारकडे आवश्यक फॉर्म दाखल करण्यासाठी आवश्यक पावलं उचलावीत. फाउंडेशनमध्ये सामील होण्याची संधी मिळाल्याबद्दल मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो आणि संस्थेला तिच्या सर्व प्रयत्नांमध्ये यश मिळावं, अशी मी इच्छा व्यक्त करतो.''

पायलनं पोस्ट करताना एक क्रिप्टिक कॅप्शन शेअर केलं आहे. पायलनं कॅप्शनमध्ये लिहिलं आहे की, ''कधीकधी शांतता अंतरासारखी दिसते...''.

# झारखंडचे खासदार निशिकांत दुबे यांची खासदारकी रद्द करून कठोर शासन करा: डॉ. गोपाल बछिरे

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** खासदार निशिकांत दुबे यांनी बनावट खोटी एमबीए ची डिग्री संसदेत सादर केली व महाराष्ट्र विषयी वल्गना करून महाराष्ट्राचा तसेच मराठी माणसाचा अपमान केल्याबद्दल त्यांची खासदारकी रद्द करून कठोर शासन करण्यात यावी अशी मागणी शिवसेना उ.बा.ठा. चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी राष्ट्रपती यांच्याकडे निवेदना द्वारे करण्यात आली

झारखंड चे खासदार निशिकांत दुबे यानी एक तर आपले शिक्षणएम.बी.ए.असल्याचे संसदेत लेखीप्रतिज्ञापत्र दिलेआहे वही डिग्री दिल्ली विद्यापीठाची असल्याचे शपथेवरशपत पत्रातसांगितले,पण ही डिग्री खोटी बनावट असल्याचे स्वतः दिल्ली विद्यापीठानेच स्पष्ट केलेआहे.या खासदारानेसंसदेची



फसवणूक केल्याबद्दलत्याचे संसद सदस्यत्व रद्द होणे क्रमप्राप्त आहे.त्याचबरोबर निशिकांत दुबे यांनीपरवामहाराष्ट्रा विषयी जी गरळओळखली त्यात तो म्हणाला ‘‘महाराष्ट्रात काहीहीशिललकराहिलेलं नाहीमहाराष्ट्र कंगाल झालेला आहे,महाराष्ट्राच संपूर्ण वैभव संपलेल आहे, येथेकोणता मोठा उद्योग नाही,आमच्या श्रीमंतीवर तुम्ही मराठी माणसेव महाराष्ट्रजगत आहे,तुम्ही मराठी मानसमहाराष्ट्र बाहेर आलेतर मराठी माणसांना आपटून आपटून मारूत'' निशिकांतदुबे चे हे विधानभारतात सर्वात जास्त जीएसटी रूपाने कर देणारा एकमेव राज्याचा व छत्रपती शिवाजी महाराज, शाहू,फुले, आंबेडकरांचा वारसा असलेल्यामहाराष्ट्राचा घोर अपमान करणारे आहे आणि म्हणूनखासदारनिशिकांत दुबे याचे संसद सदस्य पद रद्द करून त्याला कठोर शासन व्हावे अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे निवेदन लोणारचे तहसीलदार मा. भूषण पाटील यांच्यामार्फत महामहिम राष्ट्रपती यांना देण्यात आले आहेयाप्रसंगी शिवसेना उभाठाचे जिल्हा संघटक प्रा.डॉ.गोपालसिंह बछिरे, तालुकाप्रमुख ॲड. दीपक मापारी, शहरप्रमुख गजानन जाधव, महिला तालुकाप्रमुख सौ. तारामती जायभाये,तालुका उपप्रमुख लीलाताई मते,ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे , प्रकाश सानप,शाम राऊत, शहर संघटक तानाजी मापारी शाहर उपप्रमुख लूकमान कुरेशी युवा सेना शहरप्रमुख श्रीकांत मदनकर, विभाग प्रमुख गोपाल मापारी, तानाजी अंभोरे, अल्पसंख्यांक सेनेचे इकबाल कुरेशी, अशपाक खान, फहीम खान, वाहतूक सेनेचे असृबा धारकर,गफ्फार शाह, लालूभाई शेख, वसिम शेख, अमोल सुटे, विजय घोडके,भारत राठोड , शमीम शेख, कलीम कुरेशी नदीम कुरेशी, मंगेश मोरे, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जिथे कोयते उगारले त्याच जागेवरुन पोलिसांनी भाईची 'वरात' काढली, पुण्यातील कोयता गँगचा माज उतरवला

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात कोयता गँगची दहशत कायम चर्चेत असते. औंध भागात कोयत्याचा धाक दाखवत दहशत माजवणाऱ्या सात जणांच्या टोळीला चतु:शृंगी पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे ज्या भागात या टोळीने कोयत्याने हल्ला केला, त्याच भागातून पोलिसांनी या आरोपींची धिंड काढली.

नऔंध भागात कोयत्याचा उपद्रव करणाऱ्या टोळीविरोधात चतु:शृंगी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. सात जणांच्या टोळीने २८ जून रोजी रात्री १२.१५ वाजता काही तरुणांवर कोयत्याने आणि काठ्यांनी हल्ला केला होता. या घटनेनंतर परिसरात दहशतीचं वातावरण पसरलं होतं. याप्रकरणी पोलिसांनी सात आरोपींना अटक करून त्यांची धिंड काढली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औंध परिसरात झालेल्या हल्ल्याचा उगम पूर्ववैम नस्यातून झाला होता. या प्रकरणी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तातडीने कारवाई करत पोलिसांनी सर्व सात आरोपींना ताब्यात घेतलं असून त्यांच्याकडून एक गावठी कट्टा आणि तीन लोखंडी कोयते जप्त करण्यात आले आहेत.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत: प्रतीक सुनील कदम (२६), अमीर अल्लाउद्दीन शेख (२८), अतुल श्याम चव्हाण (२७), रॉबिन दिनेश साळवे (२६), समीर अल्लाउद्दीन शेख (२६), जय सुनील गेंगाट (२१), अभिषेक अरुण आवळे (२४)

पोलिसांचा अधिक तपास सुरु

हल्ल्यात वापरलेले कोयते आणि गावठी कट्टा जप्त केल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक खोलात सुरू केला आहे. या टोळीचे इतर गुन्हे आणि संभाव्य संपर्कही तपासले जात आहेत. चतु:शृंगी पोलिसांनी या कारवाईद्वारे एक कडक संदेश दिला असून, शहरात कायदा-सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना माफ केलं जाणार नाही, हे स्पष्ट केलं आहे.

### माझ्या मुलाला कोणतंही व्यसन नव्हतं, तो ट्रिटमेंटसाठी मुंबईला जात होता; अपघातानंतर सुरेश धसांचं स्पष्टीकरण

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या आष्टी मतदारसंघातील भाजपचे आमदार सुरेश धस यांचा मुलगा सागर धस यांच्या कारने सोमवारी एका दुचाकीस्वाराला उडवल्याची खळबळजनक घटना समोर आली होती. या अपघातात दुचाकीस्वार नितीन प्रकाश शेळके (वय ३४) या हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाला होता. तब्बल २४ तासांनी ही घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी सागर धस यांच्यावर सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेमुळे राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली होती. या पार्श्वभूम ीवर सुरेश धस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत याबाबत भाष्य केले आहे.

माझ्या मुलावर रीतसर गुन्हा दाखल झाला आहे. तो मुंबईला एका ट्रिटमेंटसाठी येत होता. अहिल्यानगर जिल्ह्यात अपघात झाला आहे. शेळके नावाच्या तरुणचा यात मृत्यू झाला आहे. माझ्या मुलाला कोणतंही व्यसन नाही. त्यामुळे ड्रिंक अँड ड्राईव्हचा अजिबात विषय नाही. त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. काल सायंकाळी साडेपाच वाजता त्याची सुटका झाली आहे, असे सुरेश धस यांनी सांगितले.

अपघातावेळी सागर धस हे स्वत: गा.डी चालवत होते. याप्रकरणी सागर धसविरोधात सुपे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे म हामार्गावर जातेगाव फाटा शिवारात आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारची धडक बसून, दुचाकीवरील हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाला. सोमवारी (७ जुलै) रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास हा अपघात झाला.

### मुख्यमंत्र्यांचे शहर बनतेय मध्य प्रदेशातील चोरांचा गड, आणखी एक घरफोड्यांची आंतरराज्यीय टोळी जाळ्यात

**नागपूर /प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शहर नागपूर मध्य प्रदेशातील चोरट्यांचा गड बनत चालले आहे. शहरातील विविध भागांत घरफोड्या करून लाखो रुपयांचे दागिने लंपास करणाऱ्या आणखी एका आंतरराज्यीय टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला. बुधवारी यातील तिघांना बेड्या पोलिसांनी ठोकल्या. हे तिघेही म ध्यप्रदेश येथील सराईत गुन्हेगार आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी चोरलेली दुचाकी आणि दागीने असा ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. टोळीतील दोन चोर फरार आहेत. यात टोळीच्या म्होरक्याचाही समावेश असून मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथून तो टोळी चालवत होता.

शेरसिंग त्रिलोकसिंग चव्हाण, (वय २३ रा. उमरटी, जिल्हा. बलवाडी), दीपक सिंग केला सिंग बर्नाला (वय २४, रा. उमरटी), प्रकाश सिंग जगदीश सिंग कलमा (वय २०, रा. पलसूद, जि. बडवानी) अशी पोलिसांनी अटक केलेल्या चोरांची नावे आहेत.

# मोफत व्यापक आरोग्य तपासणी मोहिमेचा ग्रामीण भागातील जनतेने लाभ घ्यावा - संजय रायमुलकर

**दैनिक आपला विदर्भ**







**मेहकर/प्रतिनिधी :** स्टेट बँक फाउंडेशनच्या माध्यमातून जीवनम सुरक्षा अभियाना अंतर्गत मेहकर ,लोणार तालुक्यांच्या ग्रामीण भागातील नागरिकांची मोफत व्यापक आरोग्य तपासणी मोहीम सुरू करण्यात आली असून त्या माध्यमातून रोग निदान आणि उपचार करण्याची व्यवस्था होणार आहे. याचा जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केले.

स्टेट बँक सामाजिक फाउंडेशन आणि नयोनिका आय केयर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाचा आरोग्य विभाग, डेन्मार्क सरकार यांच्यावतीने कॅन्सर , नेत्र रोग ,श्वसनाचे आजार यासह १४ रोगांची तपासणी, अद्ययावत यंत्रसामुग्रीद्वारे त्या त्या गावांमध्ये करण्यात येणार आहे. मेहकर येथील नागरिकांसाठी ग्रामीण रुग्णालयात आज आयोजित शिबिराचे उद्घाटन माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते झाले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनीता हिवसे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी बोलताना संजय रायमुलकर यांनी वरील आवाहन केले.

शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, माजी सभापती दिलीपराव देशमुख, युवासेनेचे तालुकाप्रमुख भूषण घोडे, अॅड .विनोद नरवाडे, रविराज रहाटे, मनोज जाधव ,विकास जोशी ,राजू काटे, वैभव सावजी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. स्वप्नील चव्हाण, डॉ. निखिल घोडे, डॉ. आशिष वनारे, डॉ. धैर्यशील रहाटे, डॉ. शैलेश पळसकर, डॉ. प्रियंका राठोड, डॉ. अजगर, डॉ. योगिता जयस्वाल यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक भाषणात स्टेट बँक फाउंडेशनचे डॉ. दत्ता साखरे म्हणाले की, बुलढाणा जिल्ह्यात प्रत्येक गाव शहरातील नागरिकांची आद्ययावत पद्धतीने मोफत तपासणी करण्यात येणार असून केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार त्याची सुरुवात मेहकर, लोणार तालुक्यांपासून करण्यात येत आहे. इसीजी ,कार्डियाक तपासण्या करण्यात येणार आहेत.केंद्र,राज्य सरकार आणि डेन्मार्क सरकार यांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जाणार आहे.संजय रायमुलकर यांची आरोग्य तपासणी करून मोहिमेचा आरंभ करण्यात आला. आपल्या भाषणात संजय रायमुलकर पुढे म्हणाले की, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा गतिमान झाली आहे . त्यांच्याच मार्गदर्शनाखाली जीवनम सुरक्षा तपासणी मोहिमे अंतर्गत पहिल्या टप्प्यात मेहकर, लोणार तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याची विशेष तपासणी मोफत करण्यात येणार आहे. यात रोगांचे निदान करणे शक्य होणार असून शासकीय योजनांच्या माध्यमातून नागरिकांच्या उपचाराची ही सोय करण्यात येणार आहे. शिवसेना आणि रुग्णसेवा हे पूर्वीपासून अतूट नाते आहे. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सरपंच, सामाजिक कार्यकर्ते यांनी त्या त्या गावांमध्ये संपूर्ण नागरिकांची या मोहिमेत तपासणी करून घ्यावी. ग्रामीण भागासाठी ही खूप मोठी उपलब्धी आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून दोन्ही तालुक्यातील रुग्णांच्या वैद्यकीय उपचारासाठी तीन कोटी ४० लाख रुपये मला उपलब्ध करून देता आले.

मेहकर येथे दहा कोटींचे ट्रामा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण झाले आहे. डॉक्टर्स व कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे. असे सांगून रायमुलकर पुढे म्हणाले की, ४९ कोटी रुपये खर्चाच्या उपजिल्हा रुग्णालयाला मेहकर येथे मंजुरी मिळवली असून त्याचीही उभारणी लवकरच होईल.यावेळी डॉ.धैर्यशील रहाटे , दिलीपराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले. ग्रामीण रुग्णालयाचे संदीप पागोरे ,वायाळ, धनंजय जाधव ,दीपक लहाने ,समाधान काळे, राजीव डोंगरे व इतर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# हळद उत्पादक शेतकऱ्यांची कार्यशाळा; नैसर्गिक हळद उत्पादन तंत्रज्ञान विषयी प्रशिक्षण संपन्न



**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांना लागवडीपासून तर काढणीपर्यंत संपूर्ण मार्गदर्शन करण्यासाठी बिबखेडा येथे नैसर्गिक हळद उत्पादन तंत्रज्ञान याविषयी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी निवृत्ती पाटील उद्यानविद्या विभाग कृषी विज्ञान केंद्र करडा यांनी नैसर्गिक पद्धतीने हळद उत्पादन घेण्याकरिता शेतकऱ्यांना प्रात्यक्षिके प्रशिक्षणे व प्रक्षेत्र भेटीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

वाशिम जिल्ह्यातील हळद हे प्रमुख पीक म्हणून समोर येत असून यावर्षी जिल्ह्यात जवळपास अठरा ते वीस हजार हेक्टर क्षेत्रावर हळद पिकाची लागवड झालेली आहे. उद्यानविद्या विभाग, कृषी विज्ञान केंद्र, करडा यांच्या द्वारे नैसर्गिक पद्धतीने हळद उत्पादन घेण्याकरिता शेतकऱ्यांना प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे व प्रक्षेत्र भेटीच्या द्वारे मार्गदर्शन करण्यात येत असून शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे व उत्पन्न देखील अधिक मिळत असल्याचे दिसून येत आहे. याचाच भाग म्हणून काल दिनांक ८ जुलै मंगळवार रोजी तालुक्यातील बिबखेडा येथे कृषी विज्ञान केंद्र, करडा व नवचैतन्य कृषि विकास शेतकरी उत्पादक कंपनी, रिसोड यांच्या वतीने नैसर्गिक हळद उत्पादन तंत्रज्ञान या विषयी एक दिवसीय प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन सुशांत दिनकर आटोळे यांच्या शेतात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बिबखेडा गावचे उपसरपंच विठ्ठल नरवाडे यांची तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतिशील शेतकरी दिनकर आटोळे यांची उपस्थिती होती तांत्रिक मार्गदर्शक म्हणून निवृत्ती पाटील, उद्यानविद्या तज्ञ, के. व्ही. के. करडा यांची उपस्थिती होती. प्रमुख उपस्थिती मध्ये शिरपूर येथील प्रगतिशील हळद उत्पादक शेतकरी गजानन ढवळे, नैसर्गिक हळद उत्पादक शेतकरी गोविंद देशमुख, रामकिशन चोपडे, गणेश गव्हाणे, योगेश खानझोडे, दीपक बुधवंत, कृष्णा मानवतकर, गोपाल बोरकर यांची उपस्थिती होती. सदर प्रशिक्षणास रिसोड मालेगाव वाशिम आणि लोणार तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला प्रशिक्षणाच्या प्रास्ताविक पर मार्गदर्शनात सुशांत आटोळे यांनी मागील वर्षापासून नैसर्गिक शेती पद्धतीमध्ये गोकृपा अमृत द्वारे करत असलेल्या पीक नियोजनाबद्दल माहिती देत नैसर्गिक शेती पद्धती द्वारे सुद्धा अधिकाधिक हळद उत्पादन घेणे शक्य असल्याचे सांगितले. करडा येथील गोविंद देशमुख व भर जहागीर येथील रामकिशन चोपडे आणि कोयाळी येथील गणेश गव्हाणे यांनी या पद्धतीद्वारे मागील चार ते पाच वर्षापासून घेत असलेल्या हळद उत्पादनाबद्दल आपले अनुभव कथन केले. तांत्रिक सत्रात उद्यानविद्या तज्ञ, निवृत्ती पाटील यांनी जमिनीची उत्पादन क्षमता व पिकांची अन्नसाखळी याविषयी माहिती दिली.

### तैमूर, जेहनंतर पुन्हा पटौदींच्या घरात पाळणा हलणार? करीनाच्या व्हेकेशन फोटोंमुळे चर्चांना उधाण

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूडची बेबो म्हणजेच करीना कपूर खान आपल्या क्लासी आणि हटके अंदाजामुळे नेहमीच चर्चेत असते. करीनाच्या प्रोफेशनल लाईफसोबतच तिची पर्सनल लाईफसुध्या नेहमीच चर्चेत असते. सध्या बेबो व्हेकेशनवर असून आपले काही हॉट फोटो ती सोशल मीडियावर शेअर करतेय. या फोटोंमध्ये करिनानं मोनोकनी घातली आहे. सोशल मीडियावर करीनाचे फोटो सध्या व्हायरल होत आहेत. म त्र, चर्चा फक्त करीनाच्या फोटोचीचं नाहीतर ती तिसऱ्यांदा आई होणार असल्याच्या चर्चांनाही उधाण आलं आहे.

सोशल मीडियावर करीनानं जे फोटो शेअर केलेत, त्यामध्ये ती स्किन आणि ब्लॅक कलरच्या मोनोकनीमध्ये असल्याचं पाहायला मिळतंय. फोटोम ध्ये करिनाचं पोट पाहून नेटकऱ्यांना ती तिसऱ्यांदा आई होणार असल्याची शंका आली आहे. तेव्हापासूनच करिना कपूर प्रेग्नंट असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. एका युजर्सनं लिहिलंय की, ही प्रेग्नंट वाटतेय. तर, दुसऱ्या युजरनं लिहिलंय की, खरंच ही तिसऱ्यांदा प्रेग्नंट आहे? अशा अनेक कमेंट्स करीना कपूरच्या फोटोंवर नेटकऱ्यांकडून केले जात आहेत.

# दुर्गा टेकडी निसर्गरम्य परिसरात प्रयोगशाळा व पर्यटन माहिती केंद्राचे काम पूर्ण..!

**दैनिक आपला विदर्भ**

■ देवानंद सानप



**लोणार :** जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ () अमरावती विभाग अंतर्गत सुरू असलेल्या कामांना आता गती मिळू लागली आहे.या अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रयोगशाळा व पर्यटन माहिती केंद्राचे काम पूर्णझाले असून लवकरच त्याचे उद्घाटन होणार आहे. या केंद्रामध्ये पर्यटकांना लोणार सरोवराची वैज्ञानिक व ऐतिहासिक माहिती मिळणार असून, प्रयोगशाळेमध्ये भूगर्भशास्त्रीय व पर्यावरणीय अभ्यासासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.लोणार सरोवराच्या संवर्धनासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे.

प्रयोगशाळा, कॉन्फरन्स हॉल, म्युझियम कामे पूर्ण* प्रयोगशाळा कॉन्फरन्स हॉल पर्यटन माहिती केंद्र म्युझियम यांचे बांधकाम पूर्ण झाले असून, लवकरच या सर्व प्रकल्पांचे लोकार्पण होण्याची शक्यता आहे. या सुविधांमुळे पर्यटकांना एकाच ठिकाणी सरोवराची वैज्ञानिक,ऐतिहासिक आणि भौगोलिक माहिती मिळणार आहे. प्रयोगशाळेमध्ये लोणार सरोवरातील खारट पाणी, जमिनीचे रासायनिक गुणधर्म, ज्वालामुखीच्या प्रभावांचे अभ्यास करता येणार आहे. तर कॉन्फरन्स हॉलच्या माध्यमातून संशोधन परिषद, चर्चासत्रे आणि पर्यटनविषयक उपक्रम आयोजिता येणार आहेत.म्युझियममध्ये लोणार सरोवराची निर्मिती, इतिहास, परिसरातील जैवविविधता याची झलक देणारे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. पर्यटन माहिती केंद्रामार्फत मार्गदर्शन, माहितीपत्रक पर्यटक यांना माहिती दिली जाणार आहे.

तारांगण रिसॉर्ट व संग्रहालयाचे काम प्रगतीपथावर लोणार सरोवराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यातील महत्त्वाचे प्रकल्प असलेले तारांगण रिसॉर्ट आणि संग्रहालय(म्युझियम) सध्या दोन्ही कामे जलद गतीने सुरू आहेत. तारांगण रिसॉर्ट लोणारच्या पर्यटनाला नवे परिमाण देणारे ठरणार आहे. येथील रात्रीचा अंधार आणि आकाशदर्शनासाठी अनुकूल वातावरण लक्षात घेता, रिसॉर्टमध्ये स्टार गेजिंग, खगोल अभ्यास आणि रात्री मुक्कामाची उत्तम सोय करण्यात येणार आहे. खगोलप्रेमींसाठी हे ठिकाण केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. दुसरीकडे संग्रहालयामध्ये लोणार सरोवराची निर्मिती ज्वालामुखीचा इतिहास पर्यावरणीय वैशिष्ट्ये प्रदर्शन उभारण्यात येत आहे पर्यटकांना माहितीपूर्ण आणि अनुभवात्मक पर्यटनाची संधी मिळणार आहे. या दोन्ही इमारतीचे कामे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अमरावती विभागामार्फत केली जात असून लवकरच प्रकल्प पूर्णत्वास जाऊन पर्यटकांसाठी खुले करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली लोणार हे जागतिक पर्यटन नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित होईल असा विश्वास

## विविध वृत्त...

### आमदार संजय गायकवाड यांच्याकडून वरणासाठी कँटीनच्या मॅनेजरला मारहाण

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी मुंबईतील आमदार निवासातील कँटीन मॅनेजरला वरणासाठी बेदम मारहाण केली. आमदार निवासातील कँटीनमध्ये निकृष्ट दर्जाचं अन्न दिल्याचा आरोप करीत संजय गायकवाड यांनी कँटीन चालकाला जबर मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला ९ जुलै २०२५ रोजी गायकवाड यांनी आमदार निवासाच्या कॅन्टीनमध्ये शिळे अन्न दिल्याच्या कारणावरून कर्मचाऱ्याला बुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप झाला. या प्रकरणात अद्याप कोणतीही कायदेशीर कारवाई झाल्याची माहिती नाही, परंतु या घटनेने त्यांच्या प्रतिमेला आणखी धक्का बसला.

### कोलवड आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, कोलवड जि. बुलढाणा येथे शैक्षणिक सत्र २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील तसेच आजुबाजूच्या जिल्ह्यांतील पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन गृहपाल एस.एस. चौरपगार यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांनी १० जुलै २०२५ पर्यंत https://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह मुदतीत वसतिगृह कार्यालयात प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अर्ज भरताना सूचनांनुसार अर्जात स्वतःचा मोबाईल क्रमांक नोंदवावा. मोबाईल क्रमांक आधार व बँक खात्याशी जोडलेला असावा. नावाची नोंदणी करताना आधारकार्डवरील नावासारखेच तंतोतंत भरावे. अर्जासोबत पालक व विद्यार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र जोडणे आवश्यक. त्याचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रवेशासाठी कागदपत्रे: जातीचा प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड,मागील शैक्षणिक वर्षाचे गुणपत्रक, बोनाफाईड प्रमाणपत्र किंवा प्रवेश पावती, बँक पासबुक, दोन पासपोर्ट साईज फोटो, पालकांचे व विद्यार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र (स्वरूप संकेतस्थळावर उपलब्ध).

विद्यार्थ्यांनी व पालकांनी अर्ज भरताना दिलेली सर्व माहिती अचूक व सत्य असल्याची खात्री करूनच सादर करावी. चुकीची किंवा अपूर्ण माहिती आढळल्यास अर्ज फेटाळला जाऊ शकतो. अधिक माहितीसाठी आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, कोलवड बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे गृहपाल यांनी कळविले आहे.

### अभिनेत्री आलिया भटला असिस्टंटने लावला ७७ लाखांचा चूना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूड अभिनेत्री आलिया भटची माजी पर्सनल असिस्टंट वेदिका प्रकाश शेट्टी हिला जुहू पोलिसांनी बंगळुरूहून अटक केली आहे. वेदिकावर आलियाची प्रोडक्शन कंपनी इटरनल सनशाइन प्रॉडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि तिच्या पर्सनल अकाऊंटमधून तब्बल ७६,९०,८९२ चा गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप आहे. मे २०२२ ते ऑगस्ट २०२४ दरम्यान ही फसवणूक करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, आलियाची आई आणि प्रोडक्शन हाऊसच्या संचालक सोनी राजदान यांनी २३ जानेवारी २०२५ रोजी जुहू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली तेव्हा हे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वेदिका शेट्टीने २०२१ मध्ये आलिया भटची पर्सनल असिस्टंट म्हणून काम करण्यास सुरुवात केली आणि २०२४ पर्यंत या पदावर राहिली. या काळात तिला आर्थिक व्यवहारांशी संबंधित अनेक अधिकार देण्यात आले होते.

पोलीस तपासात असं दिसून आलं आहे की, वेदिकाने बनावट बिलं बनवली आणि आलियाला त्यावर स्वाक्षरी करायला लावली. हे खर्च आलियाच्या प्रवास, मीटिंग्स आणि इतर कार्यक्रमांशी संबंधित आहेत असं खोटं सांगून ती अभिनेत्रीची सतत दिशाभूल करायची.

तिने ऑनलाईन टूल्सचा वापर करून प्रोफेशनलपणे ही बिलं डिझाइन केली, जेणेकरून ती खरी वाटतील. आलियाने या बिलांवर स्वाक्षरी केल्यानंतर, संबंधित रक्कम एका जवळच्या मित्राच्या खात्यात ट्रान्सफर केली जायची. मित्र नंतर सर्व पैसे वेदिकाला परत करायचा. पोलिसांत तक्रार दाखल झाल्यानंतर, वेदिका शेट्टी फरार झाली आणि सतत तिचं लोकेशन बदलत राहिली. ती सर्वात आधी राजस्थान, नंतर कर्नाटकमध्ये, नंतर पुणे आणि शेवटी बंगळुरूला पोहोचली. जुहू पोलीस पथकाने तिला बंगळुरूहून अटक केली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# मेहकर तालुक्यात ३९ हजार २०१ हेक्टर वरील पिकांना फटका

## ➤ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी :
## ➤ राष्ट्रवादी काँग्रेस युवक बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यात २५ व २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीने जनता हतबल झाली आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जमिनी खरडून गेल्या पुढील अनेक वर्षे जमिनीमध्ये उत्पादन सुद्धा घेता येत नाही.त्यामुळे शेतकऱ्यांसमोर जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.नैसर्गिक आपत्तीने हतबल झाला आहे. यामध्ये मेहकर तालुक्यातील डोणगाव परिसरात सर्वात जास्त नुकसान झाले आहे तब्बल ३५५ घरांची पडझड झाल्याची नोंद आहे.तर, हा आकडा याऐक्षाही जास्त होऊ शकतो. तालुक्यातील शेतकऱ्यांना व नागरिकांना मायबाप शासनाने तात्काळ आर्थिक मदत देऊन शेतकऱ्यांना धीर द्यावी, अशी मागणी ९ जुलै रोजी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस युवक बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे. मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, मेहकर तालुक्यात तब्बल ३९ हजार २०१ हेक्टर वरील पिकांना फटका बसला असून ४८ हजार ४५१ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तालुक्यातील शेंद्रा येथील आशाबाई प्रभाकर लोंढे या महिलेच्या अंगावर घराची भिंत पडून तिचा मृत्यू झाला आहे.तर, दादुलगाव येथील रोहिदास श्रावण शिरसाट या इसमाचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला आहे. घरात पाणी जाऊन घरांची भिंत पडून किंवा घर पडून डोणगाव परिसरात तब्बल ३५५ घरांची नुकसान झाली आहे. त्याचबरोबर तर ३९ हजार २०१ हेक्याटरवरील पिकांना अतिवृष्टीचा फटका बसला असून ४८ हजार ४४१ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १२० हेक्टर वरील मूंग पिकांचे नुकसान झाले असून त्याचा ३४० शेतकऱ्यांना फटका बसला आहे. १४० हेक्टर वरील उडीद पिकांचे नुकसान झाले असून ३६० शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. ३३४१ हेक्टर क्षेत्रावरील तूर पिक उध्वस्त झाले असून याचा ५१२१ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. सोयाबीनचे तब्बल २८ हजार ६४० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून ३४ हजार १२० शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. ४१० हेक्टर वरील हळद पिकांचे नुकसान झाले असून ५४० शेतकऱ्यांना यांचे नुकसान झाले आहे.१६० हेक्टर क्षेत्रावरील भाजीपाला पिकाचे नुकसान झाले असून २६५ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. त्याचबरोबर तीस हेक्टर वरील फळ पिकांचे नुकसान झाले असून ४५ शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. ६३६० हेक्टर जमिन खरडली आहे.बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यात तब्बल ३९ हजार २०१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून ४८ हजार ४५१ शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान झाल्याने ते हतबल झाले असून या नुकसानीचा मायबाप शासनाने तात्काळ मोबदला म्हणून आर्थिक मदत द्यावी. डोणगाव परिसरात पडलेल्या घर मालकांना सुद्धा तात्काळ आर्थिक मदत करावी.अशी मागणी ९ जुलै रोजी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस युवक बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी शरदचंद्रजी पवार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सचिव पंकज पळसकर. रिसोड तालुक्याचे तालुकाध्यक्ष माधव शेवाळे सह उपस्थित होते

### प्रताप सरनाईकांवर बॉटल भिरकावली, ५० खोकेच्या घोषणा; त्या घटनेनं शिंदेंच्या आमदारांची धाकधूक वाढली

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या विजयी मेळाव्याची शिंदेंच्या शिवसेनेच्या आमदारांनी धास्ती घेतल्याचं सांगण्यात येत आहे. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चेने मराठीचा मुद्दा मांडण्यात शिवसेना शिंदे गट मागे पडत असल्याची आमदारांमध्ये कुजबूज सुरु असल्याची सूत्रांची माहिती आहे. अशातच मित्र पक्ष भाजपकडून हिंदीचा मुद्दा उचलून धरत असल्याने मतदारसंघात शिंदेंच्या आमदारांची गोची झालाचे शिवसेनेचे आमदार खासगीत बोलत आहेत.

## कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य

**बुलडाणा/प्रतिनिधी :** कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा यासाठी शेतकरी ओळख क्रमांक १५ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अजूनही शेतकरी ओळख क्रमांक बनवलेले नसेल, तर त्यांनी तात्काळ आपल्या नजीकच्या नागरी सुविधा केंद्र किंवा ग्राम कृषी विकास समितीकडे जाऊन नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक बनवून घ्यावा, असे आवाहन कृषि उपसंचालक संजीवनी कणखर यांनी केले आहे.

जिल्ह्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत एकूण ४ लाख ३४ हजार ४६८ लाभार्थी असून, त्यापैकी ३ लक्ष ५ हजार ४४७ शेतकऱ्यांनी आतापर्यंत फार्मर आयडी काढले आहेत. पीक कर्ज, पीक विमा, किसान क्रेडिट कार्ड, पीएम किसान योजनेचे अनुदान, नैसर्गिक आपत्ती मदत अशा शासनाच्या विविध योजनेसाठी फार्मर आयडी अनिवार्य आहे.

शेतकरी ओळख क्रमांक अंतर्गत कृषी व संलग्न विभागाकडून शेतकऱ्याच्या शेताची, आधार क्रमांकाशी संलग्न अशी माहिती एकत्र करून "फार्मर रजिस्ट्री" तयार करण्यात येणार आहे. या माहितीच्या आधारे लाभार्थ्यांची अचूक निवड करून कृषी योजनांचा लाभ अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने वितरित करता येईल. शेतकरी ओळख क्रमांक तयार झाल्यानंतर शेतकऱ्यांना वारंवार प्रमाणिकरण करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच सातबारा उतारा आधार कार्डाशी लिंक करून ठेवणे आवश्यक आहे.

आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, आधारशी लिंक असलेले बँक खाते, ७/१२ उतारा (सातबारा) किंवा नमुना ८.

जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ३ लाख ९९ हजार १९० शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात 'फार्मर आयडी' तयार करण्यात आले आहेत. शेतकरी ओळख क्रमांक शिवाय कृषी विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतकरी ओळख क्रमांक त्वरित बनवून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

## दरोड्यातील आरोपीस सहा तासात मुद्देमालासह अटक

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** धनज पोलीस स्टेशन हद्दीत अज्ञात आरोपींनी घातलेला दरोडा ६ तासाच्या आत उघड करून आरोपीस गजाआड करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार ८ जुलै रोजी रात्री ९ वाजता दरम्यान चालक ज्ञानेश्वर माधवराव मोरे रा.अहिरवाडी हा अमरावती येथून अशोक लेलॅन्ड १८१५ वाहन क्र. एम.एच.१४ एल.एक्स.२२८० मधे पशुखाद्य भरून वाशीम मार्गे जवळाबाजार जि. हिंगोली असे जात होता. अमरावतीचे बाहेर आल्यानंतर चालकाने विश्रांती घेवून निघाला असता रात्री अंदाजे ३ वाजताच्या दरम्यान म्हसला फाट्याजवळ गतीरोधक असल्याने वाहनाचा वेग कमी केला. त्याचवेळी मागुन एक पांढया रंगाची टाटा कंपनीची एम.एच.२६ पासिंग असलेली कार अज्ञात इसमांनी अशोक लेलॅन्ड वाहनाचे पुढे आडवी लावली. कारचा चालक कारमध्ये थांबला व ४ ईसम उतरले. त्यांनी अशोक लेलंडचे चालकाला खाली ओढून चाकूचा धाक दाखवुन त्याला तेथेच सोडून, अशोक लेलॅन्ड १८१५ वाहन पशुखाद्यासह अंदाजे एकूण २५ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन घेवून गेल्याने आरोपीविरुद्ध धनज पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला.

नज पोलीस स्टेशनचे ठाणेदार भारत लसते यांनी तात्काळ तपास पथक तयार केले. चालकाच्या माहिती घटना व आरोपींचे वर्णन यावरुन तपासाची चक्रे फिरवून संशयीत आरोपी पांडूरंग तातेराव मेथे याची गोपनीय माहिती घेतली. मिळालेल्या माहितीवरुन तांत्रिक पध्दतीने तपास केला. तसेच वाहन घेवून गेलेल्या मार्गावरील मानोरा, दिग्रस, पुसद ठोणदारांना माहिती देवुन ठाणेदार धनज व स्टाफने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तत्परतेने दखल घेवून शिघ्रगतीने तपासचक्रे फिरवून घटनास्थळावरुन सुमारे १०० कि.मी. दुरवर चोरीस गेलेला अशोक लेलॅन्ड वाहन पशुखाद्यासह ताब्यात घेवून, आरोपीनी गुन्ह्यात वापरलेल्या कारसह सर्व आरोपींना अटक केली आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, कारंजा उप विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक भारत लसते, पोलीस उपनिरीक्षक शिंदे, अंमलदार गजानन वर, आशिष खाडरे, राजेश अंबुरे, अफसर रायलीवाले, मनोज डहाके, किरण गुहे, प्रफुल गावडे पुसद येथील सपोनि केदारे,शेंबडे, अंमलदार आकाश, भगत, मनोज, दातीर यांनी केली आहे.तपास पथकाला पुरस्कार देण्यात आला आहे.

## सावळदबारा -देऊळगांव गुजरी रस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य

दैनिक आपला विदर्भ

### खड्डे बुजविण्याची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांची मागणी

सावळदबारा : सावळदबारा -देऊळगांव गुजरी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून रस्त्यावर पाणी साचून राहत असल्याने वाहनधरकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित विभागाने लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे,अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्यासह वाहनधारकांकडून होत आहे. परिसरात ७ व ८ जुलै या दोन दिवसात जोरदार पाऊस झाल्याने या खड्ड्यांमध्ये पाणीच पाणी साचले आहे.त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनधारक गाडी चालवताना खड्ड्यातील पाण्याचा अंदाज येत नसल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहेत. सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामीचे मंदिर आहेत.

दर्शन घेण्यासाठी विविध राज्यातील भाविक भक्त याच सावळदबारा -देऊळगाव रस्त्यावरून ये जा करतात.सावळदबारा या ठिकाणी काम निमित्त येण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांना याच रस्त्यावरून ये -जा करावी लागते. सावळदबारा येथे महाराष्ट्र ग्रामीण बँक,जिल्हा मध्यवर्ती बँक,शाळा,कॉलेज, महाविद्यालय, महाविरण कार्यालय, पोस्ट ऑफिस, पोलीस चौकी,पशु वैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, या ठिकाणी सावळदबारा आजुबाजुच्या गावातील ग्रामस्थांना येथे दररोज सावळदबारा येथे काम निमित्त ये.जा करावी लागते त्यामुळे सावळदबारा ते देऊळगांव गुजरी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहेत. सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामी मंदिर आहेत. या ठिकाणी विविध राज्यातील भाविक भक्त दर्शन घेण्यासाठी येथे येतात. भाविक भक्त देऊळगाव गुजरी पासून सावळदबारा येतात. रोडवर खड्डे पडले आहेत. पाऊस झाल्याने या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे मोठमोठे खड्डे होत आहेत. सावळदबारा,देव्हारी, नांदातांडा, घाणेगाव, मोलखेडा, टिटवी, पळसखेडा, महालब्धा, पिंपळवाडी,मूर्ती, आदी परिसरातील ग्रामस्थांना सावळदबारा येथे काम साठी दररोज काम निमित्त सावळदबारा या ठिकाणी ये जा करावी लागते. तसेच सोयगाव येथे काम निमित्त जाण्यासाठी याच सावळदबारा -देऊळगाव गुजरी या रस्त्यावरून ये जा करावी लागते. रात्रीच्या वेळी वाहनधारकांचे अपघात घडत आहेत.याकडे संबंधीत विभागाने लक्ष देयाकडे संबंधीत विभागाने लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्यासह वाहनधारकांकडून होत आहे.

# २ किलो ३१३ ग्राम गांजा जप्त पोलीस प्रशासनाची कारवाई

दैनिक आपला विदर्भ





**उमरखेड /प्रतिनिधी :** उमरखेड महागाव महामार्ग रोडवर असलेल्या राजस्थान धाब्याजवळ एक इसम ज्याने अंगात काळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट परिधान केलेला आहे असा इसम गांज्याची विक्री करण्याच्या उद्देशाने अवैध रित्या गांजा अंमलीपदार्थ घेउन रस्त्याने येत आहे. अशा गोपनिय माहिती मिळाल्यावरुन पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ पो स्टे उमरखेड, पोउपनि योगेश जाधव, पोउपनि सागर इंगळे, पोहेका/२०२० पोशि/६७९ नोळे ११९१ महाळनर, पोशि/१३७ दरबस्तेवार, चालक पोकों २६३२ रुद्र तसेच वजनकाटेवाले, फोटोग्राफर, दोन सरकारी पंच असे रवाना होवुन सदर ठिकाणी जावुन आरोपी नामे गजानन अशोक डहाळे, वय-अं २५ वर्ष, रा. गोचरस्वामी वार्ड, सोनार लाईन, उमरखेड याला ताब्यात घेऊन त्याजवळून गांजा अंमली पदार्थ ज्याचे निव्वळ वजन २३१३ ग्रॅम किंमत अं २०,०००/-रुपये प्रति किलो प्रमाणे असा एकुण ४६०००/- रुपये किमतीचा गांजा अंमली पदार्थ जप्त केला.

सदर कारवाई यवतमाळ पोलीस अधिक्षक कुमार चिंता साहेब, मा. अप्पर अधिक्षक श्री थोरात साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री हनुमंत गायकवाड सा., पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे. उमरखेड पोउपनि योगेश जाधव डी बी प्रमुख पोलीस उपनिरीक्षक पोउपनि सागर इंगळे, पोहेका/२०२० संदिप टाकुर, पोहका दिनेश चव्हाण, पोशि/६७९ नोळे, पोशि/११९१ महाळनर, पोशि/१३७ दरबस्तेवार, चालक पोकों/ २६.३२ रुद्र यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.